# <u>वाचन प्रेरणा दिन - अहवाल</u>

दि.१५ ऑक्टोंबर २०२०

कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय बोदवड येथे मराठी विभागाच्या वतीने 'वाचन प्रेरणा दिन'साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून मराठी विभाग प्रमुख डॉ.रत्ना जवरास यांनी डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. त्यांच्या जीवन परिचय करून देत असताना डॉ. कलामांच्या जीवनातील अनेक संघर्षपूर्ण घटनांचा आढावा घेतला.डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचे बालपण, माध्यमिक शिक्षण व महाविद्यालयीन शिक्षण,व इंजिनियरची पदवी मद्रास इन्सिट्युट ऑफ टेक्नोलॉजी (एम.आय.टी).येथून घेतली. मिसाईल मॅन व जनतेचे राष्ट्रपती म्हणून असलेली त्यांची ओळख, भारताचे 11 वे राष्ट्रपती, पद्मविभूषण,भारतरत्न, या सर्वोच्च पुरस्काराने त्यांना सन्मानितही करण्यात आले. तसेच जाधवपूर विद्यापीठाने त्यांना डॉक्टर ऑफ सायन्स ही पदवी बहाल केली. पृथ्वी,अग्नी,आकाश,त्रिशुल,नाग या क्षेपणास्त्रांचे यशस्वी वैज्ञानिक म्हणून मान्यता पावलेले मिसाइल मॅन 27 जुलै 2015 ला शिलांग येथे आमरत्वात विलिन झाले. त्यांना जीवनात किती संघर्ष करावा लागला याचीही जाणीव डॉ. रत्ना जवरास यांनी विद्यार्थ्यांना करून दिली. तसेच महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. माधव वराडे यांनी ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्याविषयी तसेच ग्रंथालयात नियमित विद्यार्थ्यांनी यावे व त्यांना वाचनाची गोडी लागावी असे आवाहन यानिमित्ताने ग्रंथपाल यांनी केले. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी 'वाचन प्रेरणा दिन' उस्फूर्त प्रतिसाद देत साजरा केला.यानिमित्ताने ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जीवनावर आधारित पुस्तकांचे वाचन विद्यार्थ्यांनी केले. तसेच ज्यातून विद्यार्थ्यांमध्ये प्रेरणा निर्माण होईल असे वाचन विद्यार्थ्यांनी यावेळी केले. 'वाचन प्रेरणा दिन' हा कार्यक्रम मराठी विभागाकडून ऑनलाइन झुमॲपच्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेला होता. यामध्ये 35 विद्यार्थी सहभागी झाले होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन गायत्री मराठे यांनी केले. ऑनलाइन कार्यक्रम आयोजित करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्राध्यापक अरविंद चौधरी आम्हाला नेहमी प्रेरणा देत असतात. तसेच महाविद्यालयाचे उपप्राचार्य डी.एस. पाटील सर यांनी कार्यक्रमाला उपस्थित राहून आम्हाला सहकार्य केलं. त्याबद्दल मराठी विभागाच्या वतीने डॉ. रत्ना जवरास यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्राध्यापक अरविंद चौधरी उपप्राचार्य श्री.डी.एस.पाटील मराठी विभाग प्रमुख डॉ रत्ना जवरास यांनी विशेष प्रयत्न केले.









डॉ.रत्ना जवरास
मराठी विभाग प्रमुख

बोदवड

प्राध्यापक अरविंद चौधरी
प्राचार्य

दिव्यमराठी दि 16/10/2020

## बोदवड : डॉ.जवरास यांचा संवाद

**बोदवड ।** महाविद्यालयातील मराठी विभागाने गुरुवारी 'वाचन प्रेरणा दिन' साजरा केला. विभाग प्रमुख डॉ. रत्ना जवरास यांनी डॉ.एपीजे अब्दुल कलाम यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. डॉ.कलाम यांचे व्यक्तिमत्व संघर्षातून घडले, असे सांगितले. ग्रंथपाल डॉ.माधव वराडे यांनी डॉ.कलाम यांच्याविषयी माहिती दिली. विद्यार्थ्यांनी वाचनाकडे वळावे असे आवाहन केले. यानंतर डॉ.कलाम यांच्या जीवनावर आधारित पुस्तकांचे वाचन विद्यार्थ्यांनी केले. या ऑनलाइन उपक्रमात ३५ विद्यार्थी सहभागी झाले होते. आभार गायत्री मराठे यांनी मानले.

16/10/20